# GLIMPSES IN LANGUAGE AND LITERATURE

**Chief Editor**

Mr. K.B. Giri

Dr. S.V. Kshirsagar

Dr. S.B. Donge

Dr. S.U. Kalme

ISBN No. 978-93-83995-65-4
Anuradha Publications, Nanded

# Glimpses in Language and Literature

**Chief Editor**
Mr. Kailas B. Giri
Dr. Sanjiv V. Kshirsagar
Dr. Satish B. Donge
Dr. Sachin U. Kalme

**ISBN No.** 978-93-83995-65-4

**Published by:**

Anuradha Publications

Cidco-Nanded

**Publication Year:** 2019-20

**Price-** Rs. 100/-

**Copyright © ACS College, Gangakhed**

**Printed by**

Gurukrupa Offset,

Near Police Station, Gangakhed

**Typesetting by:**

Simran Computers

Gangakhed Dist.Parbhani

**Cover Designby:**

Mr. Imran K. Mohammad

# CONTENTS


| Sr. No. | Content |
|---|---|
| **01** | **Non-Verbal Communication as an Integral Aspect of Personality**<br>Dr. Sanjay N. Kadam & Dr. Tukaram Bobade |
| **02** | **Theme of Partition and Religious Discord in Khushwant Singh's "Treain to Pakistan"**<br>Mr. Kailas B. Giri |
| 03 | आधुनिक हिंदी उपन्यासों साहित्य में दलित चेतना<br>प्रा. डा. निवृत्ती एस. भेंडेकर |
| **04** | **Feminine Consciousness Reflected In Rabindranath Tagore's Play 'Chitra'**<br>Dr. Sanjay N. Kadam |
| 05 | दृक-श्रव्य प्रसार माध्यम : दुरदर्शन और हिंदी विज्ञापन<br>भेंडेकर एन.एस. |
| **06** | **Voice to the Unvoiced In the Play of Mahesh Dattani'S 'Tara'**<br>Mr. Kailas B. Giri |
| 07 | आंबेडकरवादी समीक्षेचा मानदंडः मूल्यवेधी सम्यक समीक्षा<br>डॉ. कीर्तीकुमार मोरे |
| 08 | A Complex East- West Culture Conflict In Girish Karnad's "Driven Snow"<br>Dr. R. T. Bedre, & Dr. Sanjay N. Kadam |
| 09 | आईच्या संवेदनशिलतेने क्रांती घडवू पाहणारी कविता: प्रश्नांची मातृभाषा<br>प्रा.डॉ. कीर्तीकुमार मोरे |
| 10 | Anita Desai's 'Fire on the Mountain: A Critical Study<br>**Mr. Kailas B. Giri** |

# आंबेडकरवादी समीक्षेचा मानदंडः मूल्यवेधी सम्यक समीक्षा

**डॉ. कीर्तीकुमार मोरे,**
मराठी विभाग प्रमुख,
संत जनाबाई महाविद्यालय, गंगाखेड, जि. परभणी
८२७५८२५८३५

सा.द.सोनसळे हे आंबेडकरवादी लेखक, समीक्षक व विचारवंत आहेत. अमोघ वक्ता, व्यासंगी संशोधक म्हणूनही ते परिचित आहेत. 'मराठी दलित आत्मचरित्रातील स्त्री चित्रण' या विषयावर त्यांनी आपले संशोधन कार्य पूर्ण केले. कविता, नाटक, संशोधनपर ग्रंथांचे लेखन असा त्यांचा विपूल लेखन प्रपंच. 'मूल्यवेधी सम्यक समीक्षा' हा त्यांचा संशोधनपर, समीक्षात्मक लेखांचा संग्रह असलेला ग्रंथ. मानवी जीवनातील कारुण्याचा शोध घेऊन त्यावर कायम उपाय शोधण्याचा प्रयत्न लेखकांनी, साहित्यिकांनी केला पाहिजे. त्यातूनच आनंदमय जीवनाकडे प्रवास होतो. साहित्यिकांच्या वाङ्मयीन कलाकृतींचा, विचारकृतींचा आंबेडकरी मूल्यांच्या माध्यमातून वेध घेण्यासाठी मूल्यजागराची भूमिका घेत हा ग्रंथ सिद्ध झाला आहे.

तथागत बुद्ध, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही मानवतावादी विचारांची संपन्न परंपरा महाराष्ट्राला, देशाला आहे. संविधानानेही याचा मानवतावादी मूल्यांचा आग्रह धरला. 'ज्यांनी त्या मूल्यांना अनुसरुन लिहायला सुरुवात केली त्या वाङ्मयाची समीक्षासुद्धा याच नीतिमूल्यांचा आदर्श घेऊन करावी लागेल.' ही भूमिका घेऊनच मूल्यवेधी सम्यक समीक्षा या ग्रंथाचे लेखन झाले आहे. संविधानक मानवीय मूल्यांची रुजवणूक करणे हेच या लेखनाचे प्रयोजन मानावे लागेल.

या ग्रंथात एकूण बावीस प्रकरणांचा समावेश आहे. त्यातून विविध विषयावरील चिंतन प्रकट होते. परंतु संबंध लेखनातून एक विवक्षित सूत्र स्पष्ट होत जाते. हे सूत्र मानवीय विचारांची परंपरा अधोरेखित करणारे आहे. संगणकाधीन, अॅन्ड्राईड स्मार्टफोन, सॅटफोनच्या जमान्यात व्हाट्सअॅप, फेसबुक, इन्स्टाग्राम, ब्लॉग लेखनादी नवी संवाद माध्यमे, समाजमाध्यमे प्रभावी होताना दिसतात. अशा स्थितीत स्वतंत्रपणे लेखन करणारी, भूमिका घेऊन लेखन करणारी काही थोडी माणसे आहेत. त्यात सा.द. सोनसळे यांचे लेखन महत्त्वाचे ठरावे.

साठोत्तरी आंबेडकरवादी लेखन प्रवाहाचे वैशिष्ट्य असे की त्यातून अननुभूत अनुभव विश्वाचा आविष्कार घडला. कथा, कादंबरी, काव्य, नाट्य, आत्मकथनादी वाङ्मयप्रकारांतून आविष्कृत झालेल्या साहित्याच्या मूल्यमापनासाठी प्रस्थापित समीक्षेचे मानदंड अपुरे ठरले. जीवनविन्मुख कलावादी अलौकिकतावादी समीक्षेची कोंडी आंबेडकरवादी समीक्षेने फोडली. नव्या जीवननिष्ठ समीक्षाप्रवाहाचा उदय झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार प्रेरणास्थानी ठेवून माणूस आणि 'माणसाची प्रतिष्ठा' केंद्रस्थानी ठेवून मूल्यमापनाचे निकष अस्तित्त्वात आले. नकार, बंड, विद्रोह, आत्मभान आदीच्या साहाय्याने आत्मशोधाच्या वाटा प्रकाशमान झाल्या. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, न्याय मानवता ही पंचसूत्री ह्या समीक्षाप्रवाहाचे प्राणतत्त्व बनले. प्रस्थापितांनी आंबेडकरवादी साहित्याची व समीक्षेची संभावना केली. आक्रमकतेचा,

आक्रस्ताळेपणाचा, एकसूरी असल्याचा आरोप केला. पण या प्रवाहाच्या सैद्धांतिकतेची पकड इतकी घट्ट होती की, साया आक्रमणांना अंगावर घेत त्याने स्वतःचे सत्त्व राखले.

आंबेडकरी साहित्य आणि समीक्षेने, आदीवासी, भटके विमुक्त, अन्य बहुजन शोषितांना आपल्या सैद्धांतिक मांडणीत अंतर्भाव केला परंतु पुढे जात मानसिकतेने ग्रस्त भारतीय स्वभावानुसार अंतर्भूत अन्य बहुजनांनी आपली स्वतंत्र चूल थाटली. पृथकपणे अभिव्यक्तीची वाट स्वीकारली तरी त्यांना आंबेडकरी विचार प्रेरणेचे महत्त्व टाळता आले नाही. हे एका अर्थाने वैचारिक आणि सैद्धांतिक ध्रुवीकरणच होते. परिणास्वरुप साठोत्तरी अन्य वाङ्मयीन प्रवाहांतूनही त्या त्या साहित्यप्रवाहांच्या वैचारिक प्रेरणांचा शोध सुरु झाला.

'खेड्याकडे चला' म्हणणारे म. गांधी ग्रामीण साहित्याचे प्रेरणास्त्रोत की 'शेतकयांचा आसूड' लिहिणारे म.फुले? 'खोती' सारखी शोषण पद्धती नष्ट झाली पाहिजे. शेतकयांना भरावा लागणारा 'सारा' उत्पन्नावर आधारीत असला पाहिजे, असा विचार मांडणारे आणि कायम शेतकयांच्या बरोबर असणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ग्रामीण साहित्याचे प्रेरणास्त्रोत? खल सुरु झाला. अंतिमतः म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा ग्रामीण साहित्य प्रवाहांतील महत्त्वाचे साहित्यिक समीक्षक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. एस.एस. भोसले, डॉ. प्रल्हाद लुलेकर आदींनी मान्य केली.

स्त्रीवादी साहित्यसमीक्षेबाबत हेच घडले. स्त्रीवादी साहित्य प्रेरणांचा शोध परकीय साहित्यात घेऊ पाहणाया स्त्रीवाद्यांना स्त्रीवादाला भारतीय भूमी देताना फुले-आंबेडकरांशिवाय पर्याय राहिला नाही. शर्मिला रेंगे या स्त्रीवादी विदुषीने आपल्या 'अब्राह्मणी स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या दिशेने या निबंधात आंबेडकरी स्त्रीवादी भूमिका केंद्रस्थानी ठेवूनच अब्राह्मणी इतिहास लेखनाची मांडणी करावी लागेल' हे आग्रहाने मांडले आहे.

आदिवासी कवी भु जंग मेश्राम आदिवासी साहित्याची प्रेरणा आं बेडकरी विचार आणि बिरसा मुं डांच्या संघर्षात शोधतात. याचा अर्थ असा की नववाङ्मयीन प्रवाहांच्या नसानसांतून आंबेडकरी विचारांचा प्रवाह अखंड वाहतो आहे. साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहांतून अभिव्यक्त झालेल्या अनुभवांचे अर्थनिर्णयन करण्यास मराठी समीक्षा अपूरी पडली. 'कलाकृतीमध्ये सौंदर्यवाचक विधानाचे स्वरुप काय असते?' या प्रश्नाचा धांडोळा घेऊ पाहणारा कलावादी विचार कलाकृतीचे सौंदर्य घाटात की आशयात या प्रश्नांत गरगस राहिला. ताल-तोल आणि मेळाचा समतोल सैद्धांतिक भूमिका मांडणाया मर्ढेकरांना आपल्याच कवितेत साधता आला नाही. रसविचार आधीच बाद झाला होता. नवकवितेसंदर्भात तो गैरलागू होता. दलित साहित्याने मराठी साहित्याला काय दिले याचे मोठे सूचक उत्तर शरच्चंद्र मुक्तीबोध यांनी दिले आहे. ते म्हणतात, "आम्ही भाषेवर 'ॲस्थेटीक'चे प्रयोग करीत राहिलो दलित साहित्याने भाषेचे सौंदर्य काय असते हे शिकवले." जीवनातून उगवलेल्या भाषेचे दैदीप्यमान सामर्थ्य दलित साहित्याने दिले हे मार्क्सवादी समीक्षेलाही मान्य आहे. अननुभूत अनुभवविश्व, जीवनोद्भव भाषा, आणि मानवीय मूल्यविचार ही आंबेडकरी साहित्यविचाराची देण होय.

मूल्ये संहारक, विघातक असतात तशी ती सूचनात्मक आणि विधायकही असतात. विघातक, विभाजनवादी व मानवताद्रोही विचारांनी भारतीय समाज व्यवस्थेचा चेहरा विरुप केला. समाजा-समाजात विषमतेच्या भिंती उभ्या केल्या. माणूस माणसापासून दूर केला. सामाजिक संबंधात एक खोल दरी निर्माण केली. आंबेडकरी साहित्य आणि समीक्षा हा अंतराय विषमतेला समतेचा, शत्रुत्वाला मैत्रीचा, दुजाभावाला

बंधु त्वाचा अन् कुरुपतेला सुरुपतेचा पर्या य देत मानवी जीवन सुं दर करण्याचा ऐतिहासिक प्रयत्न करते. मानवतावादी मूल्ये म्हणूनच आंबेडकरी समीक्षेचे प्राणतत्त्व होय.

'सम्यक' या शब्दाचा अर्थ समुचित, उचित असा होतो. तथागत बुद्ध ज्या काळात उचित प्रज्ञा प्राप्त करतात. तो काळ पराकोटीची यज्ञीय हिंसा मानणाया वैदिक आणि पराकोटीची अहिंसा स्वीकारणाया महावीरांच्या प्रभावाचा होता. दोन्ही पर्याय नाकारुन बुद्धाने आपला स्वतंत्र मध्यम मार्ग निवडून समाजास उचिततेचे दर्शन घडवले. क्षेमेंद्राच्या औचित्य विचारावर बुद्धाचा प्रभाव असल्याचे प्रतिपादन याच कारणाने केले जाते. उचितता, संयतपणा, आत्मभानाकडून आत्मशोधाकडे होणारा आंबेडकरी साहित्याचा प्रवास हा या विचारांचाच परिपाक मानावा लागतो. सा. द. सोनसळे याच मंगल मार्गाचे पथिक समीक्षक आहेत. कलावंताच्या दृष्टीला मानवतेचं असं विशाल आभाळ लाभलं की संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील 'दुरितांचे तिमिर जावो' ही उक्ती बुद्धाच्या विश्व कल्याणाच्या विचारांशी जोडता येते. संत तुकारामांच्या 'नवसे सायासे....' सारख्या अंभगात बुद्धाचा वैज्ञानिक दृष्टीकोन शोधता येतो. 'जे का रंजले गांजले....' या अंभगात बंडखोरी दिसते. जनाई-चोखोबांच्या वेदनेचे मर्म शोधता येते. एकनाथांची कणव बुद्धाच्या करुणेशी ताडून पाहता येते. हे सारे 'मूल्यवेधी सम्यक समीक्षा' या ग्रंथात सा. द. सोनसळे यांनी केली आहे.

या ग्रंथातील बावीस लेखांतून मानवतावादी मूल्य-विचारांची परंपरा मांडली गेली आहे. याच मूल्यसरणी आधारे साहित्य समीक्षा केली आहे. संत साहित्याचे मूल्यमापन करतानाही आपल्या भूमिकेलाही तडा जाऊ दिलेली नाही. वारकरी, भागवत संप्रदायाचा उल्लेख 'बुद्धो भागवत' संप्रदाय असा करताना हा केवळ तर्क नाही तर त्याला ससंदर्भ सिद्ध करण्याची कुवत लेखक ठेवतो. या ग्रंथातील 'संत जनाबाई-चोखोबा चिरंतन वेदनेचा प्रवास', 'संताची सम्यक दृष्टी', 'राजा ढाले मुलगामी संशोधन : वाळवंटाची लेक जनाबाई' आणि 'आंबेडकरवादी अण्णाभाऊ साठे' हे लेख खूप महत्त्वाचे आहेत. त्यांना संशोधन मूल्य तर आहेच परंतु राजा ढाले यांच्यासारख्या अभिरुची संपन्न, प्रतिभावंताच्या संशोधनपर केवळ भाष्य करणे नव्हे तर त्यांचे संशोधन पुढे नेण्याचे काम सा. द. सोनसळे यांच्याकडून घडते हे विशेष.

'आंबेडकरवाद पोटभरु लोकांचा तांडा नाही तो स्वाभिमान शिकवतो', 'विद्वान शुद्रांनो जागे कारे व्हाना! तपासोनी पहाना ब्रह्मघोळ।' असे चेतविणारे म. फुले मार्क्सवाद्यांना अडचणीचे आहेत. 'अस्पृश्यांचे मूळ दुखणे दारिद्र्य नव्हते तर अस्पृश्यता हे मूळ दुखणे होते' यासारख्या विधानाची पखरण सबंध ग्रंथात होताना दिसते. पारिभाषिक शब्दजंजाळात न अडकता सहजपणाने व्यक्त होण्याकडे असलेला कल या समीक्षेला पृथकवळण देणारा आहे. साधेपणाने व्यक्त झालेली चिंतने, ससंदर्भ विधाने आणि आंबेडकरवादी भूमिकेतून झालेले हे लेखन आंबेडकरवादी समीक्षेचा मानदंड म्हणून महत्त्वाचे ठरावे असे आहे.

❑❑❑